महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे**
**जुने गरूड हायस्कूल, साक्री रोड, धुळे पीन -४२४००१**

**Email - dietdhule@maa.ac.in** दुरध्वनी - ०२६२ २३७०२२

जा.क्र.जिशिवप्रसंधु/विविध स्पर्धा/२०२५-२६/ 718 दि.२८/१०/२०२५

प्रति,
१. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
२. शिक्षणाधिकारी प्राथमिक जि प (सर्व)
३. शिक्षणाधिकारी माध्यमिक जि प (सर्व)
४. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)
५. प्रशासन अधिकारी नपा/म.न.पा. (सर्व)

विषयः शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणेबाबत...
संदर्भ:१) राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०
२) राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४
३) शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र. क्र.१०/एसडी-६ मंत्रालय, मुंबई दि. १५ मार्च २०२४ (SQAAF)
४) मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे पत्र जा. क्र. राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा/२०२५-२६, दिनांक १०/१०/२०२५
५) मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या Online बैठकीमधील सूचना.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा एकूण ४२ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धेचे निकष व नियमावली याबाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपयुक्त या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन २०२५-२६ या वर्षापासून एकूण ४२ स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व डायटकडून करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित डायटकडून मार्गदर्शक सूचना पत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.

वरील ४२ स्पर्धांपैकी **सुडोकू,शब्दकोडे निर्मिती व प्रश्नमंजुषा** या स्पर्धेच्या राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी **जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे** यांचेकडे देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत.

**सुडोकू, शब्दकोडे निर्मिती व प्रश्नमंजुषा तालुका / विभागीय स्पर्धा आयोजनाबाबत सर्वसाधारण सूचना**

१. सदर स्पर्धा तालुका, विभाग व राज्य स्तर अशा तीन टप्प्यात आयोजित केली जाईल.

२. तालुकास्तरावर सर्व स्पर्धांचे आयोजन जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी करतील.

३. स्पर्धेच्या नाव नोंदणीसाठी जिल्हा / राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख (केंद्र समन्वयक) यांना गूगल फॉर्मची लिंक देण्यात येईल.

४. केंद्रप्रमुख यांनी स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव लिंकवर नोंदवावे.

५.सर्व स्पर्धासाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य ओळखून नामनिर्देशन करावे. दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

६. केंद्रातून एक शिक्षकाला स्पर्धेसाठी पाठविणे अपेक्षित आहे. एक पेक्षा अधिक शिक्षक स्पर्धेत भाग घेण्यासाठी इच्छुक असल्यास, केंद्र पातळीवर स्पर्धा राबवून शिक्षकाची निवड करावी. त्यासाठी मूल्यांकनाचा निकष म्हणून तालुका ते राज्य पातळी यासाठी निर्धारित केलेले निकष परीक्षणासाठी उपयोगात घेता येतील.

७.स्पर्धा निहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्याची/शिक्षकाची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी.

तालुकास्तरावरील स्पर्धेतील एका विजेत्याची निवड विभाग स्तरावर सहभागासाठी होईल.

८. तालुका स्तरावरील स्पर्धा नोव्हेंबर २०२५ मधील चौथ्या शनिवारी (२२ नोव्हेंबर २०२५) रोजी आयोजित केल्या जातील.

९. विभाग स्तरावरील स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी संबधित उपसंचालक कार्यालयासह, प्राचार्य (DIET), शिक्षणाधिकारी (प्राथ.) शिक्षणाधिकारी (माध्य.) यांची राहील.

१०.विभाग स्तरावरील स्पर्धा डिसेंबर २०२५ महिन्यातील चौथ्या शनिवारी (२७ डिसेंबर २०२५) रोजी आयोजित केल्या जातील.

११.विभाग स्तरावर प्रथम पाच क्रमांकाच्या विजेत्यांची निवड राज्यस्तरावर सहभागासाठी होईल.

१२.विभाग स्तरावरील विजेत्या पाच स्पर्धकांची नावे संबंधित विभागाने राज्यस्तरीय स्पर्धा आयोजक धुळे जिल्ह्याकडे ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी पाठवावेत.

१३.राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन धुळे जिल्हा करेल.

१४.राज्यस्तरावरील अंतिम स्पर्धा जानेवारी २०२६ मधील चौथ्या शनिवारी (२४ जानेवारी २०२५) रोजी आयोजित करण्यात येतील.

१५. राज्यस्तरावर १० विजेत्या स्पर्धकांची निवड करण्यात येईल.

१६. सहभागी स्पर्धकांनी स्वखर्चाने उपस्थित रहावे.

१७. तालुका/विभागस्तर स्पर्धांसाठी  स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची व स्थळांची निवड करून विहीत कालावधीत स्पर्धा पार पाडव्यात. प्रत्येक स्पर्धेतील अंतीम विजेत्यांच्या नावांची यादी तयार करून तालुक्याने संबधित डायटकडे व विभागाकडे सादर करावी. तद्नंतर विभागाने डायट धुळे यांचेकडे dietdhule@maa.ac.in या इमेलवर माहिती पाठवावी

१८. स्पर्धेसाठी ३ परीक्षकांची निवड करण्यात यावी. परीक्षक म्हणून सेवानिवृत्त शिक्षक, सीनियर कॉलेजचे प्राध्यापक, डी.एड., बी.एड. कॉलेज यात अध्यापकाचार्य असलेले, परिसरातील केंद्र, तालुका, राज्य इत्यादीमधील तज्ञ यांची निवड करावी.

## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,धुळे आयोजित
## सुडोकू, शब्दकोडे व प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२५-२६
## सर्वसाधारण नियमावली व माहिती

**अ) सुडोकू सोडविणे , ब) शब्द कोडे निर्मिती .क) शब्दकोडे सोडविणे व ड) प्रश्नमंजुषा स्पर्धा**

**ह्या स्पर्धा**

1) शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी तसेच सर्व शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतःअनुदानित, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी खुल्या असतील.

2) सदर स्पर्धा- a) तालुका, b) विभाग व c) राज्य अशा तीन स्तरांवर घेण्यात येतील.

3) सर्व स्पर्धा मराठी माध्यमात असतील.

4) सर्व स्पर्धांबाबत अंतिम निर्णय हा आयोजकांचा असेल.

**अ) सुडोकू सोडविणे स्पर्धा नियमावली :**

**स्पर्धेसाठी गट :**

१) शिक्षक गट- इयत्ता पहिली ते बारावीला अध्यापन करणारे शिक्षक

२) ) अधिकारी गट- शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी

3) शिक्षकेतर कर्मचारी

**नियम**

१) सुडोकू सोडविण्यासाठी दिलेला कालावधी ३० मिनिटे असेल.

२) स्पर्धकांना कोणत्याही एकाच गटात सहभागी होता येईल.

३) तालुकास्तर/विभागस्तर स्पर्धेसाठी सुडोकू राज्यस्तर आयोजक जिल्हयाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. स्पर्धकांच्या संख्येनूसार आवश्यक प्रती आपल्या स्तरावरून उपलब्ध कराव्यात.

४) विभाग व राज्य स्तरांवर सुडोकूची काठिण्यपातळी तालुका स्तरांपेक्षा जास्त असेल.

५) सुडोकू स्पर्धेदरम्यान कोणतेही इलेक्ट्रॉनिक गॅझेट अथवा साहाय्य होईल असे साहित्य सोबत बाळगता येणार नाही.

६) स्पर्धा आयोजनाची जबाबदारी – दिलेल्या स्तरानुसार पर्यवेक्षक व परीक्षक नेमावेत.

७) आयोजकांनी नियुक्त केलेले पर्यवेक्षक प्रत्यक्ष स्पर्धेचे पर्यवेक्षण करतील.

८)स्पर्धा अयोजक प्रत्येक स्पर्धकांची हजेरी हजेरीपत्रकावर नोंदवतील.

९) प्रत्येक सहभागी स्पर्धकाला सुडोकू सोडविण्यासाठी कागद पुरविण्यात येईल.

१०)स्पर्धा सुरु झाल्यनंतर सुडोकू सोडविण्यास सुरुवात केल्याच्या वेळेची नोंद व स्पर्धकाने सुडोकू सोडविल्याचे घोषित केल्याची वेळ यांच्या नोंदी पर्यवेक्षक अचूकपणे नोंदवतील.

११) दोन्ही नोंदी बरोबर असल्याची खात्री आयोजक करतील. त्यानंतर स्पर्धक व पर्यवेक्षक यांची सही घेतील व आयोजकही आपली सही करतील.

१२) कमीत कमी वेळेत अचूक सुडोकू सोडविणाऱ्या स्पर्धकाला परीक्षक विजेता घोषित करतील.

१३) स्पर्धे दरम्यान स्पर्धकाने कोणतेही अनुचित वर्तन केल्यास स्पर्धकाला स्पर्धेतुन बाद केले जाईल याची स्पर्धकाने नोंद घ्यावी .

१४) परीक्षकाचा निर्णय अंतिम असेल.

**ब. शब्दकोडे निर्मितीसाठी नियमावली :**

**शब्दकोडे निर्मिती स्पर्धा ही खालीलप्रमाणे गटासाठी देण्यात आलेल्या विषयासाठी असेल स्पर्धेचे गट**

१) **शिक्षक गट** इयत्ता पहिली ते बारावी वर्गाला अध्यापन करणारे

विषय -भाषा, गणित, परिसर अभ्यास, सामान्यज्ञान,विज्ञान, सामाजिक शास्त्र,वाणिज्य

२) **अधिकारी गट**-शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी

विषय -भाषा, गणित, परिसर अभ्यास, सामान्यज्ञान,विज्ञान, सामाजिक शास्त्र,वाणिज्य

३) **शिक्षकेतर कर्मचारी गट**

विषय -भाषा, गणित, परिसर अभ्यास, सामान्यज्ञान,विज्ञान, सामाजिक शास्त्र,वाणिज्य

**नियम** :

१) शब्दकोडे निर्मिती हि स्पर्धा उपरोक्त स्पर्धकांसाठी खुली असेल.

२) स्पर्धकांना कोणत्याही एकाच गटात सहभागी होता येईल.

३) प्रत्येक गटातील सहभागीस एकापेक्षा अधिक विषयांवर शब्दकोडी तयार करता येतील.

४) शब्दकोडे निर्मितीसाठी ६० मिनिटांचा वेळ असेल.

५) शब्दकोडे हे विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार, विषय व अभ्यासक्रमाशी सुसंगत असावे. (विद्यार्थी वयोगट व विषयही नमूद करावा)

६) शब्दकोडे निर्मिती मराठी भाषेतून करावी.

७) शब्दकोडे हे आकाराने जास्तीत जास्त एका A-4 आकाराच्या कागदावर येईल एवढेच असावे.

८) शब्दकोडे निर्मिती सोबतच त्याची उत्तरसूची देखील द्यावी लागेल.

९) शब्दकोडे निर्मिती नंतर प्रत्येक स्तरनिहाय निवडीसाठी खालील निकषानुसार अंतिम विजेत्यांची निवड करण्यात येईल.

**शब्दकोडे निर्मिती निवडीचे निकष :**

| **अ.क्र.** | **निकष** | **गुण** |
|---|---|---|
| १) | विद्यार्थी वयोगटानुसार योग्य | १० |
| २) | विषय व अभ्यासक्रमाशी सुसंगत | १० |
| ३) | नाविन्यपूर्ण | १० |
| ४) | विद्यार्थी विचारप्रक्रीयेस चालना देणारे | १० |
| ५) | विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता निर्माण करणरे | १० |
| **एकूण** | | ५० |

**.क.शब्दकोडे सोडविणे नियमावली :**

स्पर्धा खालीलप्रमाणे ३ गटांमध्ये आयोजित करण्यात येईल.

**स्पर्धेचे गट**

१)शिक्षक गट- इयत्ता पहिली ते बारावी वर्गाला अध्यापन करणारे शिक्षक

२) अधिकारी गट- शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी

३) शिक्षकेतर कर्मचारी

**नियम**

१) स्पर्धकांना कोणत्याही एकाच गटात सहभागी होता येईल.

२) शब्दकोडे सोडविण्यासाठी ४५ मिनिटांचा वेळ असेल.

३) कमी वेळेत अचूक शब्दकोडे सोडविणाऱ्या स्पर्धकास विजेता घोषित करण्यात येईल.

४) खाडाखोड असलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.

५) विभाग व राज्य स्तरांवर शब्दकोड्याची काठिण्यपातळी तालुका स्तरांपेक्षा जास्त असेल.

६) तालुकास्तर/विभागस्तर स्पर्धेसाठी शब्दकोडे राज्यस्तर आयोजक जिल्हयाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. स्पर्धकांच्या संख्येनूसार आवश्यक प्रती आपल्या स्तरावरून उपलब्ध कराव्यात.

७) शब्दकोडे स्पर्धेदरम्यान कोणतेही इलेक्ट्रॉनिक गॅझेट अथवा साहाय्य होईल असे साहित्य सोबत बाळगता येणार नाही.

8) स्पर्धा आयोजनाची जबाबदारी – दिलेल्या स्तरानुसार पर्यवेक्षक व परीक्षक नेमावेत.

९) स्पर्धा आयोजनाची जबाबदारी दिलेल्या व्यक्ती /संस्थेने पर्यवेक्षक व परीक्षक नेमावेत.

१०) आयोजकांनी नियुक्त केलेला पर्यवेक्षक प्रत्यक्ष स्पर्धेचे पर्यवेक्षण करतील.

११) स्पर्धा आयोजक प्रत्येक स्पर्धकाची हजेरी हजेरी पत्रकावर नोंदवतील.

१२) प्रत्येक सहभागी स्पर्धकाला शब्दकोडे सोडविण्याचा कागद पुरविण्यात येईल.

१३) पर्यवेक्षक स्पर्धा सुरु झाल्यानंतर शब्दकोडे सोडविण्यास सुरुवात केल्याची वेळेची नोंद करतील व स्पर्धकाने शब्दकोडे सोडविल्याचे घोषित केल्याची वेळ पर्यवेक्षक नोंदवतील. दोन्ही नोंदी बरोबर असल्याची खात्री आयोजक करतील. त्यानंतर स्पर्धक व पर्यवेक्षक यांची सही घेतील व आयोजकही आपली सही करतील.

१४) स्पर्धेत सहभाग घेतलेल्या प्रत्येक स्तरावरील स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी त्या त्या स्तरावरील आयोजकाची असेल.

**ड.प्रश्नमंजूषा स्पर्धा नियमावली:**

**स्पर्धेचे स्तर :**

१) तालुका स्तर

२) विभाग स्तर

३) राज्य स्तर

**स्पर्धेचे गट**

१) शिक्षक गट इयत्ता पहिली ते बारावी वर्गाला अध्यापन करणारे शिक्षक व

२ अधिकारी गट- शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी

३) शिक्षकेतर कर्मचारी

**१) तालुका स्तर**

तालुका स्तरावर सदर स्पर्धा ऑनलाइन स्वरूपात गुगल फॉर्मद्वारे घेण्यात येईल. यात ५० बहुपर्यायी स्वरुपाचे प्रश्न असतील व ३५ मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. तालुका स्तरावर प्रथम क्रमांकाच्या विजेत्या स्पर्धकास विभाग स्तराच्या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येईल.

**२) विभाग स्तर :**

तालुका स्तरावरील प्रथम क्रमांकाचे विजेते स्पर्धक विभाग स्तराच्या स्पर्धेत सहभागी होतील. विभाग स्तरावर प्रथम क्रमांक विजेत्या स्पर्धकाचे राज्य स्तरावर स्पर्धेसाठी नामनिर्देशन पाठविले जाईल. विभाग स्तरावर सर्व सहभागी स्पर्धकांसाठी सदर स्पर्धा खालीलप्रमाणे एकूण तीन फेरीत घेण्यात येईल.

**फेरी क्रमांक १ (सामान्य फेरी)**:सदर फेरीत प्रत्येक स्पर्धकाला ५ प्रश्न विचारण्यात येतील. प्रत्येक प्रश्नासाठी ६० सेकंदाचा वेळ असेल. प्रत्येक बरोबर उत्तरासाठी ४ गुण व चुकीच्या उत्तरासाठी १ गुण वजा करण्यात येईल.

**फेरी क्रमांक २ (बझर फेरी):** सदर फेरीत एकूण १० प्रश्न विचारण्यात येतील. जो स्पर्धक सर्वात आधी बजर देईल, त्या स्पर्धकास प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी संधी देण्यात येईल. प्रत्येक बरोबर उत्तरासाठी ५ गुण देण्यात येतील व चुकीचे उत्तर दिल्यास २ गुण वजा करण्यात येतील. प्रथम संधी मिळालेल्या स्पर्धकाने उत्तर चुकीचे दिल्यास, दुसऱ्या स्पर्धकास की ज्याने दुसऱ्या क्रमांकावर बजर दिला होता फक्त त्याला संधी देण्यात येईल. स्पर्धकाने बजर दिल्यास प्रश्नाचे उत्तर दयावेच लागेल.

**फेरी क्रमांक ३ (रॅपिड फायर राऊंड)**: सदर फेरीत प्रत्येक स्पर्धकाला ५ प्रश्न विचारण्यात येतील. या ५ प्रश्नांसाठी एकूण ६० सेंकदाचा अवधी असेल. प्रत्येक बरोबर उत्तरासाठी ६ गुण. उत्तर येत नसल्यास प्रश्न पास करता येईल. या फेरीतील प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचे असतील व प्रत्येक प्रश्नास चार पर्याय असतील. प्रश्न स्क्रीनवर दाखविण्यात येतील.

**३) राज्य स्तर :**

विभाग स्तरावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळालेल्या स्पर्धकास राज्य स्तरावर पाठविण्यात येईल. राज्य स्तरावर सदर स्पर्धा विभाग स्तरानुसार उपरोक्त प्रमाणे एकूण ३ फेरीत घेण्यात येईल. राज्य स्तरावर सहभागी स्पर्धकांमधून सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या पहिल्या ५ स्पर्धकांना गुणानुक्रमे बक्षीस दिले जाईल व इतर सहभागी स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**प्रश्नमंजुषा नियमावली :**

१) प्रश्नमंजूषा स्पर्धेसाठी सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सर्व प्रथम गुगल फॉर्मद्वारे नोंदणी  करावी लागेल. विहित मुदतीत नोंदणी केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाच सदर स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येईल.

२) तालुका स्तरांवर स्पर्धकांना समान गुण असल्यास, पुन्हा एक प्रश्न विचारून ज्या स्पर्धकाने सर्वात आधी प्रश्नमंजूषा सोडवून सादर केली असेल, त्यांना प्राधान्य देण्यात येईल व विभागासाठी त्यांचे नामनिर्देशन केले जाईल.

३) सदर स्पर्धा ही सामान्यज्ञान, इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे इतिहास, भूगोल, विज्ञान, नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी विषयांचे विषयज्ञान, माहितीचा अधिकार अधिनियम २००५, अध्यापन पद्धती, बालमानसशास्त्र, शैक्षणिक कृतिसंशोधन, ज्ञानरचनावाद, शालेय शिक्षण विभागातील कायदे व नियम, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (पहिली ते आठवीसाठी), चालू घडामोडी इत्यादी विषयांवर असेल.

१) तालुकास्तर

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | वार व दिनांक |
|---|---|---|
| १ | सुडोकू,शब्दकोडे सोडविणे/निर्मिती व प्रश्नमंजुषा | [redacted] शनिवार २९ नोव्हें.२०२५ |

तालूकास्तरीय स्पर्धा आयोजन समिती संबधित तालूक्याचे गटशिक्षणाधिकारी यांनी स्थापन करावी. सदरआयोजन समितीत विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख, विषयसाधन व्यक्ती तसेच तालूक्यातील जाणकार मुख्याध्यापक किंवा किंवा शिक्षक यांचा समावेश असावा. सदर आयोजन समितीचे जेष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण) हे सदस्य सचिव असतील.

**स्पर्धेचे संभाव्य नियोजन –**

| अ.क्र | वार व दिनांक | स्पर्धेचे नाव | आयोजक जिल्हा | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तालुकास्तर | विभागस्तर | राज्यस्तर |
| 1 | चौथा शनिवार | सुडोकू,शब्दकोडे सोडविणे/निर्मिती व प्रश्नमंजुषा | धुळे | नोव्हेंबर २०२५अखेर पर्यत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील १ विजेता निवडणे) | डिसेंबर २०२५ अखेर पर्यत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील १ विजेता निवडणे) | जानेवारी २०२६अखेर पर्यत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (स्पर्धेतील १ विजेता निवडणे) |

**२) विभाग व राज्यस्तर स्पर्धा-**

विभागस्तरीय स्पर्धा आयोजनासाठी जिल्हास्तरीय समिती धुळे जिल्हा करेल. वरील नियोजनामध्ये काही कारणास्तव बदल झाल्यास SCERT / स्थानिक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) यांचे मार्फत कळविण्यात येईल.

**स्पर्धेचे ठिकाण -**

१. तालुकास्तरीय स्पर्धा - संबधित गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत कळविण्यात येईल.

२. विभागस्तरीय स्पर्धा - संबधित विभागस्तरीय DIET यांचे मार्फत कळविण्यात येईल.

३. राज्यस्तरीय स्पर्धा - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

(डॉ.जयश्री पाटील)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
धुळे

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१.मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.(सर्व) महाराष्ट्र

३.मा.आयुक्त म.न.पा.सर्व , महाराष्ट्र

४.मा.विभागीय उपसंचालक, सर्व